# विभाग नं. २

2366

## इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ५३५/वे १ (२५७)

ग्रंथ नाम अध्यारोपाववाद.

विषय मराठी वेदांत.

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(1)

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीवेदांतशास्त्रविशारदशंकराचार्यायनमः ॥ अध्यारोपापवादा
भ्यां निष्प्रपंचंप्रपंच्यते ॥ शिष्याणांबोधसिध्यर्थंतत्त्वज्ञैः कल्पितः क्रमः ॥ १ ॥ सकळ
वेदांताचासिध्धांत एक अद्वितीय परब्रह्मचसत्य आहे ॥ ते ब्रह्म ॥ वाणीस मनास ॥ वि
षयहोतनाही ॥ ते निर्विशेष आहे ॥ त्यापरब्रह्माचे ज्ञान ॥ मोक्षासस साधन आहे ॥
मोक्षाचीइच्छा ज्यामुमुक्षूसझाली ॥ त्यामुमुक्षूस ॥ बोधव्हावाह्मणून ॥ तत्वविचा
रजाणनार ॥ अनुभवीजे ॥ त्यानी येक क्रमउपाय कल्पिला ॥ तोकोणताह्मणा ल
तरऐका ॥ अध्यारोप अपवाद ज्याचे नाम ॥ तोउपाय ज्ञानाचा ॥ त्या अध्यारोप अ
पवाद न्यायेकरून ॥ निष्प्रपंच ॥ जेपरब्रह्म ॥ ते विस्तारे करून बोलिजे ते ॥ ते शिष्या
स बोधव्हावाह्मणून ॥ अध्यारोप अपवाद ह्मणजे काय ह्मणाल तर ऐका ॥ त्याचा
दृष्टांत ऐका ॥ मंद अंधःकारात ॥ दोरी असती ॥ भिरूपुरूषजो त्यास ॥ हा सर्प आहे
ह्मणून भ्रांति होती ॥ ते जे होरिवर्त्त सर्पप्रतीति ॥ त्याचे नाम अध्यारोप ॥ अप्ताच्या उपदे

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

शोधंकरून॥दोरीचेदृष्टीनझालेअसता॥ हि दोरीचसत्यआहे॥येथेसर्पकाहीनाही॥ ऐसेजे
॥ १ ॥ निश्चयात्मकजाणने॥त्याचेनाम अपवाद॥हाजैसादृष्टांत॥ तेसाच दार्ष्टांतप्रकारऐका
॥अधिष्ठणजे॥अधिष्ठान॥त्यावरतेजोआरोप॥ह्मणजेकल्पना॥त्याचेनामअ
ध्यारोप॥ एक अद्वीतीयपरब्रह्म॥तेअधिष्ठान॥ त्याअधिष्ठानब्रह्मी॥मायाआणि
संसार॥ तो अध्यारोप॥ त्याचाविस्तारऐका॥ अद्वितीयपरब्रह्म॥ प्रपंचाचापूर्वी
एकहोतेतेअधिष्ठानब्रह्म॥ त्याब्रह्मीआरोपअरोपसंगतो॥अघटीतघटनापटी
असीमायाशक्ति॥ तोप्रथमआरोप॥ यामायाशक्तिकरूनमायीकइच्छा॥ परब्र
ह्मासझाली॥ मीयेक आहे॥ बहुतहोइनऐसी॥ तेव्हातेपरब्रह्म॥अपंचीकृत॥ ॥
अकाशरूपहोऊन॥वायुरूप॥ अग्निरूप॥ जळरूप॥पृथ्वीरूप॥झालेऐसे सू
क्ष्मभूतरूपझालेजेपरब्रह्म॥ तेचपरब्रह्म॥पंचीकृतभूतरूपझाले॥ तेचअपणस्थू ॥ १ ॥
ळभूतस्वरूपझालेजेब्रह्म॥ तेब्रह्मांडस्वरूपझाले॥ चतुर्दशभुवनरूपझाले ॥॥ ॥

A joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(2A)

॥ जारज ॥ अंडज ॥ स्वेदज ॥ उद्भिज ॥ हे जे चार प्रकारची शरीर ॥ अनंत ब्रंह्मांडात आहेत ॥
या शरीर रूपे करून ॥ ब्रह्मच झाले ॥ त्या शरीरास अनुकूळ ॥ जीवनोपाय ॥ अन्न ॥
पाणी यरूप ॥ ब्रह्मच झाले ॥ त्या अनंत स्थूळ शरीरामध्ये ॥ एक एका शरीरात ॥ एक
एक लिंग देहरूप होवून प्रविष्ट झाले ॥ त्या लिंग देहामध्ये ॥ आपण जीव होऊन ॥
प्रविष्ट झाले ॥ त्या ब्रह्माच्या विशेष प्रवेशाने ॥ सूक्ष्म देह ॥ स्थूळ देह ॥ चेतन झाले
त्याकाळी ॥ चेतनाचा ॥ जडाचा ॥ तादात्म्याध्यास झाला ॥ तेच परब्रंह्म ॥ उपा
धिसंबंधे करून ॥ जीव संसारी ऐसे व्यवहारास योग्य झाले ॥ शब्दादि विषया
चा ॥ अनुभव करू लागले ॥ या प्रकारे करून ॥ अद्वितीय परब्रह्म ॥ मायाद्वारा
प्रपंच रूप होऊन ॥ जीव रूप होऊन ॥ ईश्वर रूप होऊन ॥ जो समुदाय रूप व्यवहार झा
ला त्याचे नाम अध्यारोप ॥ अता अपवाद स्वरूप ऐका ॥ एक जे अद्वितीय परब्रह्म
तेच मायायुक्त ॥ शबळ ब्रह्म ॥ ते प्रथम कारण ॥ त्या परब्रंह्माची हे पूर्वावस्था ॥

(3)

जे जे पूर्वावस्था ।। ते ते कारण ह्मणून जाणावे ।। जे जे अनंतरावस्था ।। ते ते कार्य ह्मणून जाणवे
ऐसि कारण कार्य परंपरा ।। अध्यारोपात जाणून ।। त्यानंतर ।। त्याचा अपवाद करावा
।२।। अपवाद ह्मणजे ।। अधिष्ठानात जो आरोप भासला ।। त्याचा बाध करणे ।। त्याचान्या
य ऐका ।। एक कारण ।। एक कार्य ।। ऐसा भेदव्यवहार लोकात आहे ।। त्याचा विचा
र करावा तर ।। कारणच एक सत्य आहे ।। कार्य तर काहि सिध्ध होत नाही ।। त्याचा
अनुभव प्रकार ।। दृष्टांतात सांगतो ऐका ।। त्या दृष्टांतात भेद आहे ।। एक रज्जुस
र्पाचा दृष्टांत ।। एक मृत्तिकेचा घटाचा दृष्टांत ।। त्यामध्ये प्रथम दृष्टांत स्पष्ट आहे ।।
रज्जु आधार ।। कारण सर्प ।। अध्यास कार्य ।। तो सर्प मिथ्या आहे ।। कारण रज्जूच ।।
सत्य आहे ।। ऐसे कारण अधिष्ठान ।। ब्रह्म सत्य आहे ।। अध्यस्त संसार कल्पित आ
हे ।। ह्मणून जाणावे ।। अता दुसरा दृष्टांताचा प्रकार ऐका ।। मृत्तिका कारण ।। घट कार्य
ऐसी भ्रम प्रतीति आहे ।। त्याचा विचार करा ना ।। कसा करावा ह्मणाल तर ऐका ।। ।। ।।२।।

(3A)

घटकार्यात मृत्तिका अनुस्यूत आहे ॥ कारणमृत्तिकेत घट विचारून पाहावा तर ॥ का
हि सिध्ध होत नाहि ॥ आकारच घट आहे ह्मणावा तर ॥ तो आकार मृत्तिकेचाच आहे
घटाचा काहि नाहि ॥ तेव्हा घटरूपी कार्य मिथ्या झाले ॥ तेव्हा कार्य घटच नाही
तेव्हा मृत्तिकेस कारण ऐसे जे नाम ॥ ते कल्पनाच आहे ॥ तेव्हा कार्यही नाहि ॥ कार
ण ऐसे नाम हि नाही ॥ ऐसे सिद्ध झाले ॥ तेव्हा मृत्तिकाच शुध्ध परमार्थ ॥ सत्य सिध्ध येकु ५
झाले ॥ हा दृष्टांत लौकिक ॥ त्याचे न्याये करून ॥ दार्ष्टांत ते जाणावे ॥ जे जे कार्य आ
हे ॥ ते ते कल्पित आहे ॥ ऐसे समजून ॥ कारणास सत्य जाणावे ॥ त्याचा स्पष्ट प्रकार
ऐका ॥ पंचीकृत भूतांचे कार्य ॥ ब्रह्मांड चतुर्दश भुवन च्यार प्रकारच्या प्रजा ॥ त्यांचे
जीवनोपाय ॥ अन्न ॥ पाणी ॥ ऐसे भौतिक सृष्टि स्थूळभूत कार्य आहे जे ॥ ते कारण पं
चस्थूळ महाभूताहून भिन्न नाहि ॥ तेव्हा कारण स्थूळ भूतेच आहेत ॥ ऐसा निश्चय क
रावा ॥ त्यानंतर कार्य स्थूळ भूते जे ॥ ते हि कारण अपंचीकृत भूताहून ॥ भिन्न नाहीत

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

अपंचीकृतभूतेचे आहेत॥ ऐसा निश्चय करावा॥ त्यानंतर॥ अपंचीकृत भूतेही कार्यच
आहेत॥ ऐसे समजून॥ त्याचाहि कारणात लय करावा॥ त्याचा प्रकार ऐका॥ ॥
॥ ३ ॥ प्रथम गंधतन्मात्रा कार्य रसतन्मात्रेचे रसतन्मात्रा कारण आहे ते रसतन्मात्रा जे का
रण त्याहून गंधतन्मात्रा कार्य भिन्न नाही॥ ऐसेच रसतन्मात्रा कार्य रूपतन्मात्रा का
रणाहून भिन्न नाही रूपतन्मात्रा कार्य स्पर्शतन्मात्रा कारणाहून भिन्न नाही॥ स्पर्श
तन्मात्रा जे कार्य ते शब्दतन्मात्रा कारणाहून भिन्न नाही॥ शब्दतन्मात्रा जे कार्य आहे
तेहि॥ शबळब्रह्म जे कारण त्याहून भिन्न नाही ऐसे॥ शबळब्रह्मपर्यंत॥ कार्याचा
कारणात लय करावा॥ कार्याचा कारणात लय ह्मणजे विच्यार दृष्टिने पाहाता का
र्य॥ कारणाहून भिन्न नाही॥ ह्मणजे कार्य नाहीच॥ कारणच एक आहे॥ ऐसा का
र्यकारणाचा॥ न्याय शबळब्रह्मपर्यंत॥ समजून॥ निश्चय करावा॥ कि शबळब्र
ह्माहून॥ इतर जे कार्य॥ ते काही सत्य नाहि॥ एक शबळब्रह्मच आहे॥ ऐसा निश्चय ॥ ३ ॥
करून॥ त्यानंतर विचार करावा की॥ शबळब्रह्म ह्मणजे॥ मायायुक्त ब्रह्म॥ ॥

(3A) त्याचेनामशबलब्रह्म॥ मायेचाविचारकरावातर॥ तिचेस्वरूपचसिध्धहोतनाहि॥
मायाब्रह्माहूनः॥ अभिन्नमानावी॥ किंवाभिन्नमानावी॥ किंवाभिन्नाभिन्न
मानावि॥ अभिन्नमानावितर॥ एकब्रह्मचआहे॥ ऐसेसिध्धझाले॥ भिन्न
मानावीतर॥ सद्ब्रह्माहूनभिन्नजेमाया॥ ते असतझालि॥ भिन्नाभिन्न
पक्षमानावातर॥ पूर्वोक्तिदोनदोषयेतात॥ ऐसेनानाविकल्पकेलेतर॥ माया
म्हणजेकाहि॥ येकपदार्थचनाहि॥ जेव्हामायाचनाहि॥ तेव्हामायायुक्तजेब्र
ह्म॥ तेशबलब्रह्मऐसे॥ केवळब्रह्मासशबलब्रह्मऐसेनामकल्पीतझाले॥ मा
याचनाहि॥ तेव्हातद्युक्तहिब्रह्मनाहि॥ ऐसेजेव्हाझाले॥ तेव्हामायारहितसंसार
१ ऍक हितकेवळशुद्धब्रह्मचआहे॥ ऐसेसिध्धझाले॥ तेव्हातात्पर्यार्थहानिश्चितझाला
किपूर्वीअज्ञानकाळिभेदप्रतीतिहोती॥ किईश्वरएकवेगळाआहे॥ त्याईश्वरा
हूनजीवएकवेगळाआहे॥ त्याजीवाहूनएकजगतवेगळेआहे॥ ऐसीभेदप्र

"Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai"

(5)

ती निहोती ॥ अता विचार काळी जगत मिथ्याच झाले ॥ जगाचे कारण माया ॥ तेही मि
॥ ४ ॥ थ्या झालि ॥ मायेने जगाते ईश्वर भिन्न आहे ॥ हा भ्रम झाला होता तो गेला ॥ जगत उ
पाधिने शरीर संघातद्वारा जीव आहे ॥ ऐसा भ्रम झाला होता तो हि भ्रम गेला ॥ जग
त आहे ॥ हाही भ्रम गेला ॥ तेव्हा सर्व प्राणिमात्राचे स्वरूप ॥ एक अद्वितीय परब्रह्म
च सिद्ध झाले ॥ त्याचे नाम अपवाद ॥ या अध्यारोप अपवाद प्रकारास ॥ जो अनु
भवी ॥ ब्रह्मनिष्ठ वेदांत शास्त्र निपुण ॥ आचार्य जे ॥ त्या समीप जावून ॥ अनुभ
व पर्यंत ॥ समजून घेयील ॥ त्यास अपरोक्ष ज्ञान होयील ॥ तो ज्ञान काळीच मुक्त
होयील ॥ हा समस्त वेदांताचा सिद्धांत ॥ हा जो वेदांताचा सिद्धांत ॥ निरूपण केला
संक्षेपे करून त्याच सिद्धांतास विस्तारे करून ॥ पुनः हा सांगतो ॥ चित्त समाधान क
रून श्रवण करा ॥ सच्चिदानंद स्वरूप ॥ केवळ जे ब्रह्म ॥ ते शुद्ध ब्रह्म ॥ ते अखंड आहे ॥ ४ ॥
अखंड म्हणजे ॥ देश काळ ॥ वस्तु ॥ परिच्छेद ॥ शून्य आहे ॥ याचा अर्थ ऐका ॥

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(5A)

न्यापर ब्रह्मवस्तुचे ठाई ॥ देश मिथ्या आहे ॥ काळ मिथ्या आहे ॥ आकाशादीक ॥
सकळ वस्तु हि मिथ्या आहेत ॥ का कि ॥ देश ॥ काळ ॥ वस्तु ॥ कल्पीत आहेत ॥
ऐसेच ब्रह्म स्वगत ॥ स्वजातीय ॥ विजातीय ॥ भेद शून्य आहे ॥ याचा अर्थ दृष्टां
त पूर्वक ऐका ॥ वटवृक्षाला जैसा ॥ द्वितीय पिंपळाचा वृक्ष ॥ तो सजातीय भेद वृ
क्षत्व जातीचा ॥ अथवा ॥ वटसजातीला ॥ द्वितीय जो वट वृक्ष ॥ तो सजातीय भेद ॥
पाषाण विजातीय भेद पत्रपुष्पादि स्वगत भेद ऐसा ॥ दृष्टांतात ॥ भेद सम जून ॥ ॥
तैसाच ब्रह्मी भेद नाहि ॥ ऐसे सम जावे ॥ याचा प्रकार ऐका ॥ ब्रह्मी विजातीय भेद
जगत मिथ्या आहे म्हणून ॥ नाहि ब्रह्मी सजातीय भेद ॥ जो नाना चैतन्य रूपी ॥
तो हि नाही ब्रह्मी स्वगत भेद ॥ सच्चिदानंदाचा हि नाही ॥ का कि ॥ जे सत आहे तेच
चैतन्य आहे ॥ जे चैतन्य आहे ॥ तेच आनंद रूप आहे ॥ ऐसे भेद त्रय रहित जे ब्रह्म
ते शुद्ध ब्रह्म जे ते जाणावे ॥ या ब्रह्मी एक अघटीत घटना पटीयसी माया शक्ति ॥

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(6)

आहे ॥ ते अनिर्वचनीय कल्पित तुच्छ मिथ्याभूत आहे ॥ त्याचा प्रकार ऐका ॥ ॥
॥ ५ ॥ ब्रह्माहून भिन्न मानावी ॥ मिथ्या होती ॥ अभिन्न मानावी ॥ ब्रह्म चुकाली ॥ भिन्ना
भिन्न मानावीतर ॥ विरुध्धकोटि संभवतच नाही ॥ सत्य मानावी तर ॥ ज्ञानाने
तिचा नाश होतो ॥ मिथ्या मानावी तर ॥ तिचे कार्य जगत् दिसते ॥ सत्य मिथ्या ह्म
णावी तर ॥ विरुद्धकोटी संभवतच नाही ॥ ऐसी माया अनिर्वचनीय ॥ तुच्छ मिथ्या
आहे ॥ त्या मायेसि मिळून ॥ मायायुक्त झाले जे ब्रह्म ॥ त्याचे नाम शबल ब्रह्म
ईश्वर त्या ईश्वराने ॥ भूत भौतिक रूपी केला जो प्रपंच ॥ त्याचे नाम जगत् ॥ ते ज
गत् मायेचे कार्य आहे ह्मणून ॥ अनिर्वचनीय ॥ तुच्छ मिथ्या आहे ॥ त्याच
प्रपंचात ॥ शरीरत्रय संघात समुदायात ॥ बुध्दिमध्ये ईश्वराने प्रवेश केला ॥
त्या ईश्वराच्या सत्तेने ॥ देहत्रय चेतन झाले ॥ त्याकाळी ईश्वरभाव ॥ ब्रह्मभाव ॥ ५ ॥
आच्छादन होऊन ॥ जीवत्वाचा अभिमान ॥ देहत्रयात झाला ॥ देहत्रयतादा

(6A)

श्री

स्याध्यासाने ॥ अहंवाममताझाली ॥ [redacted]ह्मणत्वादि अभिमानाने ॥ धर्माधर्मप्रवृत्ती
झाली ॥ त्याने जन्ममरणसंसार ॥ संततीचालली ॥ अकस्मात्र वेदोक्तधर्माने चि
त्तशुद्धझाली ॥ संसारातून विरक्त झाला ॥ मुमुक्षु होउन ॥ ब्रह्मनिष्ठास शरण गेला
ते विद्वान ॥ त्याला आत्मज्ञानाचा उपदेश करितात ॥ अहो शिष्य ॥ तीन शरीरे ॥
उपाधि आहेत ॥ समष्टी ॥ व्यष्टीरूप समष्टी उपाधिने ॥ ईश्वरभाव सिद्ध होतो ॥
व्यष्टिउपाधिने ॥ जीवभाव सिद्ध होतो ॥ उपाधीचा बाध केला ह्मणजे ॥ जीवत्व ॥
ईश्वरत्व दूर होते ॥ त्याचा प्रकार ऐका ॥ समष्टी स्थूलशरीर ॥ उपाधीने विराट झाला
ते स्थूलशरीर ॥ समष्टी मिथ्या जाणावे ॥ उपाधि मिथ्या झाली ह्मणजे ॥ उपहि
त हि विराट मिथ्याच आहे ॥ ऐसाच लिंगशरीर ॥ समष्टी उपाधीने झाला ॥ जो हि
रण्यगर्भ ॥ लिंगशरीर समष्टी मिथ्या जाणावी ॥ उपाधि मिथ्या झाली ह्मणजे
उपहित हिरण्यगर्भ ही मिथ्याच जाणावा ॥ ऐसाच मायाकारणशरीर समष्टी उपाधीने ॥

ईश्वर झाला ॥ माया जेव्हा मिथ्या आहे ॥ तेव्हा ईश्वरत्व हि मिथ्या जाणावे ऐसे ॥ तत्पदा
र्थाचे शोधन करावे ॥ कि तत्पदाचा अर्थ ब्रह्मचैतन्य ॥ शुद्ध निर्गुण निर्व्यापार आ
हे ॥ असंग कूटस्थ आहे ॥ ऐसे जाणून ॥ त्वंपदाचे शोधन करावे ॥ त्याचा प्रकार ऐका ॥ ॥
॥ ६ ॥ देहत्रयाहून ॥ आत्मा वेगळा आहे ॥ त्याचा प्रकार ऐका ॥ स्थूळदेह लिंगदेह ॥ कारणदेह
हे जे देहत्रय ॥ त्यामध्ये स्थूळशरीराचे स्वरूप ऐका ॥ अस्थी ॥ मांसादिकाचा जो पिंड ॥
हस्त ॥ पाद ॥ मस्तक ॥ त्यास आहे ॥ त्याचे नाम स्थूळशरीर ॥ लिंगशरीराचे स्वरूप ऐका
पंचप्राण ॥ पंचकर्मेंद्रिय ॥ पंचज्ञानेंद्रिय ॥ मन ॥ बुद्धि ॥ चित्त ॥ अहंकार ॥ या सर्वांचा जो ॥
समुदाय ॥ याचे नाम लिंगशरीर ॥ प्राण ॥ अपान ॥ व्यान ॥ उदान ॥ समान हे पंचप्राण ॥
वाक् ॥ पाणि ॥ पाद ॥ पायु ॥ उपस्थ ॥ हे पंचकर्मेंद्रिय ॥ श्रोत्र ॥ त्वचा ॥ चक्षु ॥ जिव्हा ॥ घ्राण ॥ ६ ॥
हे पंचज्ञानेंद्रिय ॥ संकल्प ॥ विकल्पात्मक मन ॥ निश्चयात्मिका बुद्धि ॥ चिंतनात्मक ॥
चित्त ॥ गर्वात्मक अहंकार ॥ कारणशरीराचे स्वरूप ऐका ॥ माझे स्वरूप माला कळत नाही ॥

(7A)

याचेनाम अज्ञान॥ याचेनामकारणशरीर॥ ऐसीहेतीनशरीरे॥ दृश्य आहेत॥ त्या
तीनशरीराच्यातीन अवस्था॥ स्थूळाचि जागृती आवस्था॥ सूक्ष्माचिस्वप्ना
वस्था॥ कारणाचिसुषुप्ति अवस्था॥ ऐशातीन्ही अवस्था॥ दृश्य आहेत
याचाद्रष्टासाक्षी॥ आत्मा भिन्न जैसा आहे॥ त्याचाप्रकार॥ अन्वयव्य
तिरेके करून ऐका॥ माझापुत्र म्हणून॥ ऐसे जेव्हा समजले॥ तेव्हा पुत्र भि
न्न आहे॥ ऐसे स्पष्ट आहे॥ तैसेच माझे स्थूळ शरीर॥ लिंगशरीर॥ माझे
जेव्हा ७ माझे ऐसें जाणतो जेव्हा॥ त्याचा जाणता आपण आत्मा भिन्न च आहे॥॥
याचा अन्वय व्यतिरेक ऐका॥ स्थूळशरीर जागृती अवस्था॥ स्वप्नातन सते
याचेनाम व्यतिरेक॥ स्वप्नात आत्मा असतो॥ याचेनाम अन्वय॥ सुषुप्ती
त॥ स्वप्नावस्था नाही॥ याचे नाम व्यतिरेक॥ सुषुप्तित आत्मा असतो॥
याचेनाम अन्वय॥ जागृती अवस्थेत॥ सुषुप्ति नाही॥ याचेनाम व्यतिरेक

"Joint project of Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(8)

जागृतीत आत्मा असतो ॥ याचे नाम अन्वय ॥ ज्याचा व्यतिरेक ॥ ते मिथ्या जा
॥ ७॥ णावें ज्या याचा अन्वय तो आत्मा परमार्थी ॥ सत्य आहे ऐसें जाणावें ॥ ऐशा अ
न्वयव्यतिरेकें करून ॥ तीन शरीरें ॥ त्याच्या तीन अवस्था ॥ त्यांतील सर्व व्यवहा
र हे अवघे हि मिथ्या आहेत ॥ याचा साक्षी सिय स्वरूप ॥ चैतन्य स्वरूप ॥ आनंद
स्वरूप ॥ मी आत्मा आहे ॥ हे त्वंपदाचे शोधन ॥ आमी आत्मा सच्चिदानंद स्वरूप
तो च मी सच्चिदानंद स्वरूप ब्रह्म आहो ॥ हा दृश्यमान सकळ संसार ॥ मिथ्या आहे
त्याचा लक्ष्य प्रकार ऐका ॥ आब्रह्म स्तंभपर्यंत जो संसार ॥ त्यांत पंच अंश आहेत
अस्ति भाति प्रिय ॥ हे तीन भाग ब्रह्म स्वरूप ॥ अधिष्ठानस्या अधिष्ठानि ॥ कल्पि
त नाम रूप हे दोन भाग मायेचे ॥ ऐसे पंच भागाचे जगत ॥ त्याची नामरूपें मिथ्या ॥ ८ ॥
समजून ॥ सत्ता ॥ भाति ॥ प्रिय रूप ब्रह्म ॥ ते सत्य आहे ॥ ऐसें जाणावें ॥ त्याचा वि
शेष प्रकार ऐका ॥ घट आहे ॥ घट भासतो ॥ घट प्रिय आहे ॥ हे ब्रह्म भाग घट हे नाम ॥

(8A)

वर्तूळ जो अकार ॥ ते घटाचे स्वरूप ॥ घट भंगला ह्मणजे ॥ नामरूपाचा लय होतो भु
मीत ॥ भूमीचा लय झाला ह्मणजे जळ मात्र शेष राहातो ॥ जळाचा अग्नीत लय झा
ला ह्मणजे ॥ अग्नि मात्र राहातो ॥ अग्निचा लय वायूत झाला ह्मणजे ॥ वायु
राहातो ॥ वायुचा आकाशात लय झाला ह्मणजे ॥ अकाश मात्र राहात ॥ ॥
त्या आकाशाचा मायेत लय होतो ॥ माया मिथ्या आहे ॥ स्वरूपी नाहीच ॥ ॥
तेव्हा शेष ब्रह्म मात्र राहिले ॥ ते ब्रह्म मी आहे ॥ ऐसे शास्त्र गुरु प्रतीतीने ॥ स्वा
नुभवाने ॥ ज्यास समजले ॥ तोच ज्ञानी ॥ ज्ञानकाळीच मुक्त होतो शेष प्रार
ब्ध भोगून विदेहमुक्तीस प्राप्त होतो ॥ ऐसा जो ज्ञानी ॥ त्याचे लिंगशरीर ॥ देहां
तरात ॥ अज्ञाना सारिखे जात नाही ॥ तेथे स्वरूपी लीन होऊन जाते ॥ त्याचा प्रकार
ऐका ॥ सकळ इंद्रिये मनात लीन होते ॥ ते मन प्राणात लीन होते ॥ प्राण तेजामध्ये लीन होते
ते तेज प्रसंग भिन्न पर ब्रह्म चैतन्यात येक होते ॥ हृदय कमळामध्ये एतावत्सर्वं तं मकार ॥

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(9)

ज्ञानी अज्ञानी यादोघांचा समान आहे ॥ अज्ञानी जो त्याची अज्ञान काम कर्मे राहि
ली ॥ ह्मणोन त्याचे प्राण निघोन ॥ देहांतरात जाते ॥ ज्ञान्याचि अविद्या काम कर्मे ॥ ॥
॥८॥ ज्ञानाग्नीने दग्ध झाली ह्मणून ॥ ते ब्रह्मी लीन झाली ॥ याचें नाम लिंगभंग ॥ मुक्ति चँ३
या प्रकारे ॥ जो ब्रह्म निष्ठापासून ॥ समजून घेयील ॥ तो मुक्त तत्कालीच होयील ॥
हा वेदांत सिद्धांत ब्रह्मैवाहं ॥ ॥ ध्रु ॥ ॥ ॥ ऐसा समस्त वेदांताचा सिद्धांत ॥ जो हो
ता तो संक्षेपे करून ॥ विस्तारे करून ॥ निरूपण केला ॥ त्याच अर्थाची दृढता व्हा
वी ह्मणून ॥ स्पष्टता व्हावी ह्मणून ॥ त्याच अर्थाते ॥ पुनः हा ॥ गुरू शिष्य संवाद द्वा
रा निरूपण करितो ॥ चित्त समाधान करून ॥ ॥ ॥ श्रवण करा ॥ ॥ ॥
॥

॥८॥

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com